**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९४/२०१९** | **दिनांक २२/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/११/२०१९ ते २२/११/२०१९)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/११/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१६/११** | **१७/११** | **१८/११** | **१९/११** | **२०/११** | **२१/११** | **२२/११** | | **२३/११** | **२४/११** | **२५/११** | **२६/११** | **२७/११** |
| ०.० | - | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३७.६ | - | ३७.९ | ३७.५ | ३८.२ | ३८.३ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३३ |
| २४.२ | - | २२.९ | २२.१ | २२.५ | २२.५ | - | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | १ | ३ | १ | ० | १ |
| १०० | - | ८८ | ९८ | १०० | १०० | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६७ | ६२ | ६० | ६१ | ६३ |
| ८२ | - | ७७ | ७० | ७७ | ७४ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४४ | ४१ | ३७ | ३७ | ४० |
| १ | - | ३ | ३२ | ३ | २ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ७ | ७ | ७ | ७ |
| आ. | - | इ. | पु. | इ. | इ. | - | **वाऱ्याची दिशा** | इ.पु. | पु. | पु. | पु. | पु. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २३ ते २७ नोव्हेंबर, २०१९ दरम्यान कमाल तापमानात वाढ संभवत आहे.**

**दिनांक २२ ते २८ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **रोपवाटिका** | • रब्बी उन्हाळी भात रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **पालवी** | • आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | - | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात व नंतर चट्टे वाढत जाऊन त्रिकोणी आकाराचे होतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि. ली. प्रतीलिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकूवर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून नष्ट करावीत व बागेची स्वच्छता राखून बागेत पूरेसा सूर्यप्रकाश येईल असे पहावे. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशकंची आलटून पालटून प्रति १० लिटर पाण्यातून एक महिन्याच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. |
| **भेंडी** | **पेरणी** | • भेंडी पिकाची लागवड जमिनीची नांगरट करून सरी पद्धतीने ४५ x १५ सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५० किलो शेणखत, ७०० ग्रॅम युरिया, ३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश प्रती गुंठा खताची मात्रा दयावी. पेरणीनंतर हलके पाणी दयावे |
| **वांगी** | **रोप अवस्था** | • वांगी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पाने लहान राहणे या रोगापासून संरक्षण करण्याकरीता पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. आणि अक्रोमायसिन ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवून लागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ४३ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **मिरची** | **रोप अवस्था** | • मिरची पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ६ टन शेणखत, ६५ किलो युरिया, १८८ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **अस्टर** | **रोपवाटिका** | • अस्टर फुलपिकाच्या रोपवाटिकेस नियमित पाणी द्यावे. |
| **झेंडू** | **रोपवाटिका** | • झेंडू फुलपिकाच्या रोपवाटिकेस नियमित पाणी द्यावे. |
| **दुभती** | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी. |

<table>
<tr><td>जनावरे/ शेळ्या</td><td></td><td>• शेळ्यांमध्ये जंताचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने शेळ्यांना अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे.</td></tr>
<tr><td colspan="3">सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा</td></tr>
</table>